वाळू उत्खननासाठी राज्य शासनाची
पर्यावरण अनुमती घेण्याबाबत......

**महाराष्ट्र शासन**
पर्यावरण विभाग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२.
परिपत्रक क्रमांक इएनव्ही १०९४/एसइएसी/प्र.क्र. १७०/तां.क. २
दिनांक : २० फेब्रुवारी, २००८

वाचा : १) शासन निर्णय पर्यावरण विभाग क्र. इएनव्ही १०९४/एसइएसी/प्र.क्र. १७०/डी-१ दिनांक ७ ऑगस्ट, १९९७
२) शासन पूरक पत्र क्र. इएनव्ही १०९४/एसइएसी/प्र.क्र. १७०/डी-१ दिनांक ३ जून, २०००

**परिपत्रक**

शासन पूरक पत्र क्र. इएनव्ही १०९४/एसइएसी/प्र.क्र. १७०/डी-१ दिनांक ३ जून, २००० अन्वये नदी खाडी क्षेत्रातील ड्रेजिंग प्रकल्पाला राज्य शासनाची पर्यावरण अनुमती घेणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. तसेच शासन निर्णय क्र. इएनव्ही १०९४/एसइएसी/प्र.क्र. १७०/डी-१ दिनांक ७ ऑगस्ट, १९९७ मधील परिच्छेद - ८ नुसार पर्यावरण अनुमतीसाठी अर्ज करण्यापूर्वी प्रकल्पधारकाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण नियंत्रण मंडळाकडून संमत्तीपत्र (Consent to Establish ) प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे.

वाळू उत्खननासाठी राज्य शासनाची पर्यावरण अनुमती प्राप्त करण्याबाबतच्या कार्यपध्दतीत सुधारणा करण्यात येत असून वाळू उत्खनन प्रकल्पासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र (Consent to Establish ) व ह्या विभागाच्या पर्यावरण अनुमतीसाठी अर्जदार एकाच वेळेस अर्ज करु शकेल. त्यानुसार अर्जदाराने वाळू उत्खननासाठी पर्यावरण अनुमती प्राप्त करुन घेण्यासाठी कंपनीचे लेटर हेड किंवा कोरा कागद यावर आवश्यक तपशिल उदा. पत्ता, दुरध्वनी क्रमांक व इतर संबंधीत माहिती नमूद करुन पर्यावरण विभागाकडे अर्ज सादर करावा. सदर अर्जासोबत संबंधीत जिल्हाधिकारी यांनी वाळू उत्खननासाठी ठेका मंजूर केल्याबाबतच्या आदेशाची सत्यप्रत व संमत्तीपत्रासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केलेल्या अर्जाची प्रत जोडणे आवश्यक राहील.

सक्शन पंपाव्दारे करण्यात येणाऱ्या वाळू उत्खननासाठी पर्यावरण अनुमती घेणे आवश्यक आहे किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने यासंदर्भात खुलासा करण्यात येतो की, उपरोक्त आदेश हे सक्शन पंपाव्दारे करण्यात येणाऱ्या वाळू उत्खननासाठी देखील लागू रहातील.

(शाम लाल गोयल)
सचिव (पर्यावरण), महाराष्ट्र शासन

प्रति,

विभागीय आयुक्त, कोकण विभाग
:
:

वाळू उत्खननासाठी राज्य शासनाची
पर्यावरण अनुमती घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यावरण विभाग,
परिपत्रक क्रमांक इएनव्ही-२००८/प्र.क्र.१०२/तां.क.३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक: २५ जून, २००८

वाचा :-१) शासन निर्णय पर्यावरण विभाग क्र. इएनव्ही १०९४/सइएसी/प्र.क्र.१७०/डी-१, दि. ७ ऑगस्ट, १९९७
२) शासन पूरक पत्र क्र. इएनव्ही १०९४/एसइएसी / प्र.क्र.१७०/डी-१ दि. ३ जून, २०००.
३) परीपत्रक क्र. इएनव्ही १०९४/एसइएसी / प्र.क्र.१७०/डी-१ दि. २० फेब्रुवारी, २००८.

शासन परिपत्रक :-

वाळू उत्खननासाठी राज्य शासनाची पर्यावरण अनुमती प्राप्त करण्याबाबतच्या उपरोक्त शासन परिपत्रक क्र. इएनव्ही १०९४/एसइएसी / प्र.क्र.१७०/डी-१ दिनांक २० फेब्रुवारी, २००८ मध्ये नमूद कार्यपध्दतीत खालील दोन बाबी अंतर्भूत करण्यात येत आहेत.

(अ) रेती उत्खननासाठी निवीदाप्रक्रीया सुरु करण्यापूर्वी उत्खननाच्या क्षेत्राबाबत, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांची पर्यावरण अनुमती संबधित यंत्रणेने (जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त) घेणे आवश्यक आहे.

(ब.) निविदा प्रक्रियेव्दारे रेती उत्खननासाठी ठेका मंजूर झाल्यावर पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांची पर्यावरण अनुमती घेताना संबंधित ड्रेझर धारक त्याच्याकडे असलेल्या साधन सुविधांचा तपशिल अर्जासोबत सादर करेल. याबाबतची तपासणी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळामार्फत करण्यात येऊन मंडळ अभिप्रायांसह आपला अहवाल पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन यांना सादर करेल.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www. maharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०७०२१३५६१२००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशाने

(श्यामलाल गोयल)
सचिव, पर्यावरण विभाग
महाराष्ट्र शासन

प्रति,
विभागीय आयुक्त, कोकण विभाग
जिल्हाधिकारी, ठाणे / रायगड / रत्नागिरी /सिंधुदूर्ग
महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई

# महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र. - ०२२ : २२८१९५१७
फॅक्स क्र. - ०२२ : २२०२५९४६

**क्र. इएन्व्ही २००८/प्र.क्र. १०२/तां.क. ३**
पर्यावरण विभाग,
मंत्रालय, १५ वा मजला,
नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग,
मुंबई-४०० ०३२.
दि. २९ नोव्हेंबर,२००८.

प्रति,
विभागीय आयुक्त,
कोकण.

**विषय :-** दि. १४/८/२००८ च्या रेतीगटाच्या लिलावास दिलेल्या स्थगितीबाबत .....

शासनाच्या दि. ११/८/२००८ च्या पत्रान्वये कोंकण विभागातील रायगड व रत्नागिरी जिल्ह्यातील सावित्री नदी व बाणकोट खाडी या संयुक्त रेतीगटाच्या दि. १४/८/२००८ रोजीच्या लिलावास दिलेली स्थगिती खालील अटींच्या अधीन राहून उठविण्यात येत असुन यातील रेतीगटांना विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी या टप्प्यासाठी कार्योत्तर पर्यावरण अनूमती देण्यात येत आहे.

१. ही कार्योत्तर मंजूरी फ़क्त दि. १४/८/२००८ च्या लिलावासाठी असलेल्या रेती गटांसाठी चालू वर्षासाठीच आहे.

२. यशस्वी लिलावधारकांनी वाळू /रेती उत्खननापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची व शासनाची मान्यता दि. २५/६/२००८ च्या परिपत्रकास अनूसरुन एक महिन्याच्या आत घेणे बंधनकारक असेल.

३. कार्योत्तर मान्यतेसाठी पद्धती फ़क्त चालू वर्षासाठी असेल.

४. CRZ अधिसूचना १९९१ चे व वेळोवेळी या विषयाबाबत निघालेल्या शासनाच्या परिपत्रकांचे / सूचनांचे उल्लंघन होणार नाही याची कृपया दक्षता घेण्यात यावी.

आपला,

(डॉ. बी.एन.पाटील)
उपसचिव (तांत्रिकं)
तथा शास्त्रज्ञ-१,
महाराष्ट्र शासन.